**MHKO120001422010**

**नियमित दिवाणी दावा क्र. ४३/२०१०**
**(दत्तात्रय वि. सरपंच, पाल)**
**निशाणी क्र.१०५,१०८ खाली एकत्रित आदेश**

प्रस्तुतचे अर्ज वादीने नि. ३,८२,८७ व १०७ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांना निशाणी देणेत यावी याकरीता केला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादींनी म्हणणे दिले व प्रस्तुतचे वादीने नि. १०७ सोबत दाखल केलेली सनद व नकाशा ही कोणत्या मिळकतीचे आहेत हे स्पष्ट होत नाही. तसेच न्यायाचे दृष्टीने योग्य आदेश व्हावेत अशी विनंती केली.

३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. सदरील प्रकरण हे सुणावणीवर आहे. एखाद्या कागदपत्रास निशाणी दिली तर तो कागदपत्र सिध्द झाला आहे असे म्हणता येत नाही व एखादया कागदपत्रास निशाणी दिली नाही म्हणून तो कागद पत्र सिध्द झाला नाही असे ही म्हणता येणार नाही. तर कोणतेही कागदपत्र भारतीय पुरावा कायदा नुसार सिध्द करणे अपेक्षित आहे.

५. सदर कामी मी पुढील न्यायनिर्णयाचा आधार घेत आहे. **बामा कठारी पाटील विरुध्द रोहीदास अर्जुन माधवे २००४(३)बी. सी. आर. ५०९ सदर न्यायनिर्णयामध्ये आदरणीय उच्च न्यायालय मुंबई** यांनी असे म्हटले आहे की, एखाद्या कागदपत्रास निशाणी दिली म्हणजे तो कागदपत्र सिध्द झाला आहे असे म्हणता येणार नाही व एखादया कागदपत्रास निशाणी दिली गेली नाही तर तो कागदपत्र सिध्द झाला नाही असे ही म्हणता येणार नाही. सर्वसाधारणपणे कोणतेही कागदपत्र सिध्द झाल्यानंतर एखाद्या कागदपत्रास निशाणी दिली जात असते परंतु प्रशासकीय कारणास्तव निशाणी दिली जाते. कोणतेही कागदपत्र हे भारतीय पुरावा कायद्यानुसार सिध्द करणे अपेक्षित आहे.

६. सदर न्यायनिर्णयाचे प्रमाण उपयोगी पडत आहे. कोणते कागदपत्र सिद्ध झाले आहे-नाही याचा उहापोह हा अंतिम युक्तीवाद व न्यायनिर्णयामध्ये होईल, तरी ओळखीपुरती संबंधीत कागदपत्रांना निशाणी देणेत येते. सबब, मी खालील आदेश पारित करतो.

| **आ दे श** | |
|---|---|
| १. | दोन्ही अर्ज (नि. १०५ व १०८) अंशतः मंजूर करण्यात येतात. |
| २. | निशाणी क्र. ३, ८२, ८७ व १०७ मधील छायांकित प्रती व्यतिरिक्त अन्य कागदपत्रांना निशाणी देणेत येते. |

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2025.10.10 11:58:06 +0530

**गारगोटी.**
**दिनांक- ०९/१०/२०२५**

**(नि. दि. रुद्रभटे )**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**गारगोटी.**